# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र. २३३ / २०१२

पुणे विद्यापीठातर्फे उपकरणीकरण अभियांत्रिकी विषयामध्ये अध्यापन करीत असलेल्या प्राध्यापकांस गुणवंत अध्यापक पुरस्कार दिला जातो. सदर पुरस्काराची रक्कम रुपये १,०००/— असून पुरस्कार दिनांक १० फेब्रुवारी, २०१३ रोजी (विद्यापीठ वर्धापन दिनी) प्रदान करण्यांत येईल.

महाविद्यालयात उपकरणीकरण अभियांत्रिकी विषयामध्ये अध्यापन करीत असलेल्या गुणवंत प्राध्यापकांचे नाव उपकरणीकरण विभागप्रमुखांनी मा. प्राचार्य यांचे शिफारशीसह दि. ०८ डिसेंबर, २०१२ पर्यंत खालील नियमांच्या अधिन राहून विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे पाठवावे.

१. अध्यापकांच्या नामनिर्देशनाच्या पूर्वीच्या तीन वर्षाच्या कामगिरीचा विचार केला जावा.

२. उपकरणीकरण विभागाच्या विकासात त्यांचा लक्षणीय सहभाग असावा आणि उपकरणीकरण विभागात ते पूर्णवेळ अध्यापक असावेत.

३. पदव्युत्तर शिक्षण, संशोधनात्मक शोधनिबंध तथा अन्य लिखाण प्रयोगशाळेतील विकासात्मक कार्य, व्याख्यान कौशल्य, समाजोपयोगी रचनात्मक कार्यातील सहभाग (उपकरणीकरण अभियांत्रिकी संबंधित) विद्यार्थी आणि सहकारी यांचेबरोबर संबंध, सेवानिष्ठा, अखिल भारतीय स्तरावरील संस्थांचे सदस्यत्व आणि त्यांच्या कार्यातील सहभाग या आणि इतर विधायक बाबी नामनिर्देशन करतांना विचारात घेतल्या जाव्यात.

४. संशोधनात्मक लेखन प्रसिध्द झाले असल्यास तपशील पाठवावा.

५. उपलब्ध असलेली सर्व प्रशस्तिपत्रके, सन्मानपत्रे यांच्या झेरॉक्स प्रती, कार्याच्या पुराव्यासाठी छायाचित्रे, कात्रणे व इतर उपलब्ध साहित्यही पाठवावे.

उपकुलसचिव,<br>
पदव्युत्तर प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे — ७<br>
संदर्भ : प.प्रवेश/ ५२६४<br>
दिनांक : २६/११/०१२

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत अभियांत्रिकी महाविद्यालये.